विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती

२०१५-२०१६

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे
अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व
अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणा-या
विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा

चौथा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक डिसेंबर २०१५ रोजी
सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर
डिसेंबर, २०१५

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती

२०१५-२०१६

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या
जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण
व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणा-या
विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा

चौथा अहवाल

एचबी २१५४-१

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती
(२०१५-२०१६)

समिती प्रमुख

(१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(४) श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.
(५) श्री. महेश चौघुले, वि.स.स.
(६) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.
(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(८) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.
(९) श्री. कुणाल पाटील, वि.स.स.
(१०) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.
(११) श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, वि.स.स.
(१२) श्री. महादेव जानकर, वि.प.स.
(१३) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.
(१४) श्री. राजेंद्र जैन, वि.प.स.
(१५) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,
(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

सन २०१५-२०१६ या वर्षाकरिता मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक १ मे २०१५ व दिनांक २१ मे, २०१५ रोजी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती नामनिर्देशित केली आहे.

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती
(२०१३-२०१४)

समिती प्रमुख

(१) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. अशोक जाधव, वि.स.स.
(३) श्री. सिताराम घनदाट, वि.स.स.
(४) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.
(५) श्री. शंकरराव गडाख, वि.स.स.
(६) श्री. गणपत गायकवाड, वि.स.स.
(७) श्री. पृथ्वीराज साठे, वि.स.स.
(८) श्री. प्रकाश (अण्णा) शेंडगे, वि.स.स.
(९) श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स.
(१०) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स.
(११) श्री. संजय (बंडू) जाधव, वि.स.स.
(१२) श्री. विजय सावंत, वि.प.स.
(१३) श्री. मुझफ्फर हुसेन, वि.प.स.
(१४) श्री. राम पंडागळे, वि.प.स.
(१५) श्री. भगवानराव साळुंखे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. जितेंद्र भोळे, उप सचिव,
(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक	विषय	पृष्ठ क्रमांक
१	प्रस्तावना	(सात)
२	अहवाल	१
३	परिशिष्ट " एक " (जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडून समितीला प्राप्त झालेली माहिती.)	९
४	परिशिष्ट " दोन " (समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत.)	२१

प्रस्तावना

मी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा (सन २०१५-२०१६) चौथा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ या वर्षासाठी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती दिनांक २२ मे २०१५ रोजी गठित झाली.

विधानसभा नियमावलीतील नियम २३८ अन्वये या समितीकडे खालीलप्रमाणे कामे सोपविण्यात आली आहेत :–

(एक) विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासाठी असलेल्या राज्य शासनाच्या विविध योजनांचे परीक्षण करणे आणि राज्य शासनाने, त्यासंबंधात काय उपाययोजना करावी या विषयाची माहिती दोन्ही सभागृहांना सादर करणे.

(दोन) राज्य शासनाने आपल्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये व पदांवर (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सांविधिक आणि निमसरकारी संस्था यातील नेमणुका धरून) विमुक्त जाती व भटक्या जमाती यांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे यासाठी केलेल्या उपाययोजनांचे परीक्षण करणे.

(तीन) राज्य शासनाच्या कक्षेत येणा-या विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासंबंधातील सर्व बाबींवर सर्वसाधारणतः विचारविनिमय करणे आणि दोन्ही सभागृहांना त्याबाबत अहवाल देणे.

(चार) समितीने सुचविलेल्या उपाययोजनांबाबत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविषयी दोन्ही सभागृहांना माहिती देणे.

(पाच) सभागृहाने किंवा अध्यक्षांनी समितीकडे विनिर्देशपूर्वक निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे.

सन २०१३-२०१४ या वर्षासाठी गठित केलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांसंदर्भात सदर कार्यालयास दिनांक २३ सप्टेंबर, २०१३ रोजी भेट देऊन तेथील संबंधित अधिका-यांशी चर्चा केली. समितीला प्रश्नावलीच्या संदर्भात पुरविलेल्या लेखी माहितीच्या आधारे व समितीने संबंधित कार्यालयास दिलेल्या भेटीच्या वेळी अधिका-यांनी

समितीला दिलेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ४ फेब्रुवारी २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, व सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष) यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिवांनी दिलेल्या माहितीचा सर्वंकष विचार करून समितीने त्या संदर्भातील आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

अहवालातील परिशिष्ट " एक " मध्ये जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती तसेच परिशिष्ट " दोन " मध्ये समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त समाविष्ट करण्यात आले आहे. समितीने दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी प्रारुप अहवालावर विचार करून तो संमत केला.

जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्या कार्यालयातील संबधित अधिकारी आणि प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग व सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष) यांनी साक्षीच्या वेळी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन सहकार्य केल्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०१५.

बाळासाहेब सानप,
समिती प्रमुख,
विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण
समिती.

अहवाल
जिल्हा परिषद, गडचिरोली

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीला प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजी जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्या कार्यालयास भेट देऊन विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली.

समितीने, गडचिरोली जिल्हा परिषदेतील वर्ग-१ ते वर्ग-४ मधील विमुक्त जाती व भटक्या जमातीची किती पदे भरण्यात आली तसेच वरिष्ठ आणि कनिष्ठ सहायक (लिपिक वर्गीय) पदांची सद्यःस्थिती काय आहे, अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेमध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीची ५२८ पदे भरण्यात आली आहेत व रिक्त असलेली पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. भटक्या जमाती (ब) मधील एक पद जास्तीचे भरले गेले आहे. सन १९९७ मध्ये विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गाची सरसकट पदे भरली होती. आता रिक्त पदांसदर्भात सन २०१३ मध्ये जाहिरात दिलेली असून पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. सहायक शिक्षकांची ६५ पदे रिक्त आहेत. सदर पदे सीईटीमार्फत भरण्यात येतात. सीईटी परीक्षा झालेली नसल्यामुळे ही पदे भरता आली नाहीत. प्राथमिक शिक्षकांची एकूण ४४१३ पदे आहेत. त्यापैकी १८० पदे रिक्त आहेत. कनिष्ठ सहायकाची २०५ पदे सरळसेवेने भरावयाची होती. " अ " प्रवर्गासाठी ४ पदे राखीव ठेवण्यात आली होती. यापैकी ३ पदे भरलेली आहेत, " ब " प्रवर्गासाठी ४ पदे राखीव ठेवण्यात आली होती. तथापि ५ पदे भरलेली आहेत, " क " प्रवर्गासाठी ५ पदे राखीव ठेवण्यात आली होती. यापैकी एकच पद भरलेले आहे आणि " ड " प्रवर्गासाठी ३ पदे राखीव ठेवण्यात आली होती. तथापि यामध्ये ६ पदे भरण्यात आलेली आहेत. अशी एकूण १५ पदे भरलेली असून १ पद रिक्त आहे. उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे त्याच प्रवर्गातील जेवढी संख्या होती, तेवढी पदे सन १९९७ मधील शासन निर्णयानुसार भरलेली आहेत. जाहिरातीनंतर पात्र आणि अपात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाते. याठिकाणी पात्र उमेदवारांची परीक्षा घेतली जाते आणि त्यानंतर भरती प्रक्रिया पूर्ण केली जाते. जिल्हा परिषदेतील सरळसेवेच्या भरतीसाठी जिल्हाधिकारी

यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आहे. सदर समितीमध्ये भरतीचा निर्णय घेतला जातो. निवड समितीमध्ये समाज कल्याण अधिकारी उपस्थित असतात. कनिष्ठ सहाय्यकाचे १ पद, परिचर-५ पदे, चौकीदार-१ पद, ग्रामसेवक-२ पदे, या पदांसह एकूण ५० पदे रिक्त आहेत. ही सर्व पदे विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील आहेत. याबाबत समितीने विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी किती टक्के आरक्षण आहे असे विचारले असता उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सरळसेवा भरतीमध्ये ८ टक्के आणि पदोन्नतीमध्ये ११ टक्के आरक्षण आहे. विमुक्त जाती (अ) साठी २ टक्के, भटक्या जमाती (ब) साठी २ टक्के, भटक्या जमाती (क) साठी २.५ आणि भटक्या जमाती (ड) साठी १.५ टक्के आरक्षण आहे असे मिळून आरक्षण ८ टक्के होते. वरिष्ठ सहायकाची ८ टक्के आरक्षणाप्रमाणे विमुक्त जाती व भटक्या जमातीची ५ पदे मंजूर आहेत. यामध्ये एक पद जास्तीचे भरलेले आहे. हे जास्तीचे पद सन १९९७ पूर्वी भरलेले आहे. दरवर्षी सरळसेवेने नोकरभरती केली जाते.

समितीने विस्तार अधिका-यांच्या संदर्भात समितीला माहिती देण्याबाबत सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, विस्तार अधिकारी यांची एकूण ३० पदे मंजूर आहेत. यापैकी विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गासाठी २ पदांचे आरक्षण असून ४ पदे भरलेली आहेत. या ठिकाणी दोन पदे जास्तीची भरलेली आहेत.

समितीने, परिचरची एकूण किती पदे मंजूर आहेत, त्यापैकी किती पदे भरली आहेत, अशी विचारणा केली असता उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, परिचरची एकूण ६८३ पदे मंजूर आहेत. एकूण ६८३ पदांपैकी ६६० पदे भरलेली असून २३ पदे रिक्त आहेत. सध्या २३ पदांची जाहिरात दिलेली असून त्यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या ५ पदांचा समावेश आहे. यापैकी ५५ पदे विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गासाठी आरक्षित आहेत. भटक्या जमाती (ब) प्रवर्गाची १४ पदे भरावयाची होती, परंतु प्रत्यक्षात २९ पदे भरली आणि १५ पदे वेगळ्या संवर्गातील आहेत. भटक्या जमाती (ड) च्या १० पदांपैकी ५ पदे भरलेली आहेत. भटक्या जमाती (क) प्रवर्गाच्या १७ पदांपैकी १० पदे भरलेली आहेत. विमुक्त जाती (अ) आणि भटक्या जमाती (ब) साठी जाहिरात दिलेली आहे.

समितीने, ग्रामसेवक पदासाठी विमुक्त जाती (अ) साठी २ टक्के आरक्षण असतांना ८ पदे दिली. भटक्या जमाती (ब) प्रवर्गासाठी २ टक्के आरक्षण असतांना १५ पदे दिली आणि भटक्या

जमाती (क) प्रवर्गासाठी २.५ टक्के आरक्षण असतांना ६ पदे दिली. अशाप्रकारे पदाचे वाटप करतांना आपण मागासवर्गीय कक्षाचे मार्गदर्शन घेतले नाही काय, अशी विचारणा केली असता सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांनी विदित केले की, ग्रामसेवकांची ४३७ पदांची बिंदू नामावली आहे. यामध्ये विमुक्त जाती (अ) ९, भटक्या जमाती (क) ११ आणि भटक्या जमाती (ड) ६ या पदांना मंजुरी घेतली आहे. सन २०११ मध्ये ४३७ पदांना मंजुरी दिलेली आहे. आयुक्त कार्यालयाने रोस्टरची तपासणी करून दिलेली असून त्यात विमुक्त जाती (अ) साठी ९, भटक्या जमाती (ब) साठी ९, भटक्या जमाती (क) साठी ११ आणि भटक्या जमाती (ड) साठी ६ अशा प्रकारे पदांना मंजुरी दिली होती. जिल्हा परिषदेने एकूण ३५ पदांपैकी ३३ पदे भरलेली आहेत. जिल्हा परिषदेने पुन्हा या कार्यालयाकडे रोस्टर तपासणीसाठी सादर केले असता एकाही पदाची जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी केलेली नाही, असा आक्षेप या कार्यालयाने नोंदविलेला होता.

समितीने ग्रामसेवक पदासाठी केव्हा जाहिरात दिली होती, याबाबत विचारणा केली असता ग्रामसेवक पदासाठी दिनांक २५ एप्रिल, २०१३ रोजी जाहिरात दिली होती. एकूण ३५ पदे असून त्यापैकी ३३ पदे भरलेली आहेत आणि २ पदे रिक्त आहेत. ग्रामसेवकाची विमुक्त जाती (अ) ८, भटक्या जमाती (ब) साठी १५, भटक्या जमाती (क) साठी ८ आणि भटक्या जमाती (ड) साठी ४ पदे पूर्वीच भरलेली आहेत असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले.

समितीने, आरोग्य सेवक (पुरुष/महिला) व औषध निर्माता यांची सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा केली असता, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी विदित केले की, आरोग्य सेवकांची सरळसेवेची २३९ पदे मंजूर आहेत. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गासाठी ८ टक्के आरक्षणाप्रमाणे २० पदे राखीव आहेत. आरोग्य सेवक (महिला) संवर्गाची एकूण ४२१ पदे मंजूर असून विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गासाठी ८ टक्के आरक्षणाप्रमाणे ३४ पदे राखीव आहेत. त्यातून ५१ पदे भरलेली आहेत. औषध निर्मात्यांची एकूण ८४ पदे मंजूर असून यापैकी ९ पदे भरलेली आहेत. प्रयोगशाळा (तंत्रज्ञ) एकूण ४५ पदे मंजूर असून विमुक्त जाती व भटक्या प्रवर्गाची ८ टक्के आरक्षणाप्रमाणे ९ पदे भरलेली आहेत.

समितीने, कनिष्ठ अभियंता संवर्गातील अनुशेषाची किती पदे शिल्लक आहेत, असा प्रश्न केला असता कार्यकारी अभियंत्यांनी विदित केले की, विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी ७ पदे आरक्षित असून त्यापैकी ६ पदे भरलेली आहेत व १ पद रिक्त आहे.

विभागीय सचिवांची साक्ष :

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने जिल्हा परिषद, गडचिरोली येथे दिनांक २३ सप्टेंबर, २०१३ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीस आ वासित केलेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ फेब्रुवारी, २०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी गडचिरोली जिल्हापरिषदेतील वर्ग-१ ते वर्ग-४ या संवर्गात सरळसेवेच्या एकूण ७२०९ पदांपैकी विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी ५७८ जागा आरक्षित असल्याचे तसेच यापैकी ५२८ पदे भरलेली असून ५० पदे रिक्त असल्याची माहिती समितीस मिळाली.

समितीने, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) मध्ये समांतर आरक्षणानुसार ८ टक्क्यांप्रमाणे पदे भरावयास हवी होती, परंतु भटक्या जमाती (ब) संवर्गात सरळसेवेची ६८ पदे जास्त भरलेली असल्याचे आढळून आले असता ही जास्त पदे का भरण्यात आली, अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी विदित केले की, विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गाचे विभाजन होण्यापूर्वीच ही पदे भरली गेली आहेत म्हणून भटक्या जमाती (ब) संवर्गात जास्त प्रमाणात पदे आहेत. यापुढे पदे भरतांना भटक्या जमाती (ब) वर्गाऐवजी विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) वर्गाची पदे आरक्षणानुसार नियमित भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

समितीने, गडचिरोली जिल्ह्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गासाठी ८ टक्के आरक्षण लागू आहे. यानुसार विमुक्त जाती (अ) साठी १४८, भटक्या जमाती (ब)-१५५, भटक्या जमाती (क)-१७४ आणि भटक्या जमाती (ड)-१०१ पदे राखीव आहेत, विमुक्त जाती (अ) ची ९१ पदे भरली असून त्यातील ५० पदे रिक्त आहेत, ही पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत, अशी विचारणा केली असता उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सन १९९७ नंतर विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाचे " अ ", " ब ", " क " आणि " ड " या वर्गवारीमध्ये विभाजन झाले व त्यानंतर विमुक्त जाती (अ) साठी २ टक्के, भटक्या जमाती (क) साठी ३ टक्के याप्रमाणे आरक्षण लागू झाले. सन १९९७ पूर्वी गडचिरोली जिल्ह्यात भटक्या जमाती (ब) प्रवर्गाची लोकसंख्या जास्त असल्यामुळे ती पदे जास्त प्रमाणात भरली आहेत. सन १९९७ नंतर " अ "," ब "," क " आणि " ड " यामध्ये विभाजन झाले तरी यापूर्वी भरलेली पदे कमी करता येत नाहीत. परंतु पुढील काळात भरती केली जाईल तेव्हा भटक्या जमाती (ब) ऐवजी विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील पदे भरण्यात येतील. सन १९९७ पूर्वी विमुक्त जाती व भटक्या जमातीचा एकच संवर्ग होता. सन १९९२ मध्ये या

वर्गवारीसाठी ४ टक्के आरक्षण लागू होते. त्यानंतर ६ टक्के आरक्षण लागू करण्यात आले. तद्नंतर मंडल आयोगाची अंमलबजावणी करण्यात आली व विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाचे विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गात विभाजन करण्यात आले. उपरोक्त पदे पूर्वी एकत्रितरित्या भरली गेली आहेत.

समितीने, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील पदे भरतांना मागासवर्गीय कक्षाची मान्यता घेतली होती काय तसेच रिक्त पदांची सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी विदित केले की, शिक्षकांची पदे सोडून बाकी सर्व पदांच्या संदर्भात रोस्टरप्रमाणे भरती केली आहे. मागील वर्षी भरती प्रक्रिया राबवितांना मे-जून महिन्यात महाराष्ट्रात एकाच तारखेला लेखी परीक्षा घेतली होती. त्यानंतर उमेदवारांच्या मुलाखती घेऊन पदे भरली आहेत. राज्यभर एकाच दिवशी परीक्षा होते. एकाच दिवशी परीक्षा घेतली नाही तर या जिल्ह्यांचा उमेदवार दुस-या जिल्ह्यात जातो आणि दुस-या जिल्ह्याचा उमेदवार या जिल्ह्यात येतो. जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती असते. त्यांचेमार्फत ही भरती प्रक्रिया पूर्ण केली जाते. जिल्हा परिषदेत शिक्षकांची ६५ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेकडून पदांचे समायोजन होईपर्यंत पदे भरली जाणार नाहीत.

समितीने, सरळसेवेची आणि पदोन्नतीची वर्गनिहाय सविस्तर माहिती देण्याबाबत सांगितले असता विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, विविध पदांच्या पदोन्नतीसाठी टक्केवारी ठरलेली असते. काही संवर्गामध्ये ५० टक्के पदे सरळसेवेने तर ५० टक्के पदे पदोन्नतीने भरली जातात. संवर्ग छोटा असेल तर २५ टक्के सरळसेवेने पदे भरली जातात. परंतु गट विकास अधिकारी यांची पदे पदोन्नतीने ५० टक्के आणि ५० टक्के सरळसेवेने भरली जातात. जास्तीत जास्त तरुण आणि उच्चशिक्षित उमेदवार सेवेत यावेत, असा त्यामागे हेतू असतो. पूर्वीच्या काळात भरती झालेल्या लोकांचे शिक्षण कमी असायचे परंतु आता एम.ए. इत्यादी सारखे उच्च शिक्षण झालेले उमेदवार मिळतात.

समितीने, परिचर व कनिष्ठ सहायक या संवर्गातील रिक्त पदांची काय स्थिती आहे, सदर पदे अदलाबदलीने भरली आहेत काय, याबाबत विचारणा केली असता उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, परिचर आणि कनिष्ठ सहायक ही पदे सोडून सर्व संवर्गात पदोन्नती दिलेली आहे. त्यांची बिंदू नामावली तपासणी झालेली आहे. जेथे ३२ पेक्षा जास्त संवर्ग आहे तेथे अदलाबदलीने तीन वर्षे पूर्ण झालेल्या उमेदवारांना पदोन्नती देऊन ही पदे भरता येतात. परंतु जेथे ३२ पेक्षा कमी संवर्ग आहे त्यासंदर्भात सन १९९७ च्या शासन निर्णयाप्रमाणे अदलाबदलीने पदे

भरण्यासंबंधी मागासवर्ग कक्षाकडे मार्गदर्शनासाठी प्रस्ताव पाठविलेला आहे. ज्या आस्थापनेत ३२ पेक्षा कमी संवर्ग असतो तेथे प्रत्येक वर्गवारीत एकेक, दोन-दोन पदे असतात. एक पद अनुसूचित जमाती, त्यानंतर अनुसूचित जाती, त्यानंतर विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागासवर्ग याप्रमाणे संधी देण्याचा प्रयत्न केला जातो. यासंदर्भात माननीय न्यायालयात एक याचिका दाखल केलेली आहे. रोटेशन ठरविण्याची भूमिका माननीय उच्च न्यायालयात मांडलेली आहे.

समितीने, जिल्हापरिषदेत ग्रामसेवकांची ४३७ पदे मंजूर आहेत. या ग्रामसेवक संवर्गातील किती कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे आणि किती कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, अशी विचारणा केली असता उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेने सर्व ग्रामसेवकांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी पत्राद्वारे कळविले आहे. शासनाने जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी यापूर्वी दिनांक ३० सप्टेंबर २०१३ पर्यंत मुदत दिली होती. त्यानंतर काही कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. ज्या ग्रामसेवकांनी प्रस्ताव दाखल केलेले आहेत त्यांनी प्रस्तावाची पावती सादर करावी असा निर्णय घेतलेला आहे.

यावर समितीने ग्रामसेवकांची ४३७ पदे भरत असताना मागासवर्ग कक्षाने " अ " प्रवर्गाचे १ पद, " ब " प्रवर्गाचे १ पद, " क " प्रवर्गाची ११ पदे व " ड " प्रवर्गाच्या ६ पदांना मंजुरी दिली असताना प्रत्यक्षात " अ " प्रवर्गाची ८, " ब " प्रवर्गाची १५, " क " प्रवर्गाची ११ व " ड " प्रवर्गाची ४ पदे भरलेली आहेत. या पदांना मान्यता नसतानाही जादा पदे कशी भरली आहेत, अशी विचारणा केली असता उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, मंजूर पदे ९ ऐवजी १५ पदे दाखविली होती. ग्रामसेवकांची सन १९९७ पूर्वी भरलेली पदे नियमित करून घेण्यात येतील. यामध्ये " अ ", " ब ", " क " व " ड " या प्रवर्गाची पदे कमी आहेत. परंतु आरक्षणानुसार पदे भरण्याची कार्यवाही केली जाईल.

समितीने, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांसंबंधी व त्यांच्या बिंदु नामावलीबाबत समितीला माहिती देण्यास सांगितले असता, शिक्षणाधिका-यांनी माहिती दिली की, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांचे रोस्टर अपूर्ण आहे. याचे कारण असे की, चंद्रपूर जिल्ह्याचे सन १९८२ साली विभाजन होऊन गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती झाली आहे. त्यानंतर १,५९० प्राथमिक शिक्षक गडचिरोली जिल्ह्यात वर्ग करण्यात आले होते. यापैकी ५९० शिक्षकांची माहिती अप्राप्त आहे. गडचिरोली जिल्ह्यात सन १९९७ पासून शिक्षकांची भरती करण्याची प्रक्रीया सुरू केली होती. यासंदर्भात

मागासवर्ग कक्षाने सन २०१० मध्ये असे निदेश दिले होते की, दिनांक १ जानेवारी, २००४ ही तारीख गृहीत धरून गडचिरोली जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांचे रोस्टर तयार करावे व ऑक्टोबर, २०१३ पर्यंत प्रस्ताव दाखल करावेत. परंतु त्यानंतर मागासवर्ग कक्षाने दिनांक १ जानेवारी १९९७ रोजीची तारीख गृहीत धरून रोस्टर तयार करण्याचे निदेश दिलेले आहेत. सन २००४ हे वर्ष गृहीत धरून रोस्टर तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले होते. तथापि, आता सन १९९७ जे शिक्षक कार्यरत होते त्यांचे रोस्टर तयार करून आरक्षणाचे काम सुरू आहे. काही शाळांमध्ये शिक्षकांची संख्या अतिरिक्त आहे. त्यानंतर समायोजनाचे निकष बदलण्यात आले असल्यामुळे पुन्हा समायोजन करून त्यांची बिंदु नामावली तपासल्यानंतर शिक्षकांची संख्या निश्चित होईल. परंतु कोणत्याही शिक्षकांवर अन्याय होऊ देणार नाही.

समितीने, आरोग्य सेवक (पुरुष व महिला) यांच्या माहितीबाबत विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, विमुक्त जाती " अ " मधील ३ पदे जादा भरलेली आहेत. आरोग्य सेवक (महिला) या संवर्गाची एकूण ४७५ पदे मंजूर होती. त्यावेळच्या ११ टक्के प्रमाणे महिलांची ५२ पदे भरली होती. परंतु सन २००२ या वर्षापासून गडचिरोली जिल्ह्यासाठी सुधारित आरक्षण लागू करून ते ११ टक्क्यांवरून ८ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात आले. यापूर्वी भटक्या जमाती हा एकच प्रवर्ग होता. त्याप्रमाणे पदे भरली जात होती. परंतु नंतर भटक्या जमाती या वर्गाचे " अ "," ब "," क " व " ड " असे प्रवर्ग निर्माण झालेले आहेत. आरक्षणातील ८ टक्क्यांप्रमाणे १७ पदे भटक्या जमातीची भरलेली आहेत. रोस्टरनुसार त्यांची इतकी पदे भरता आली नसती. ५२ टक्क्यांपेक्षा जास्त पदांचे आरक्षण देता येत नाही. त्यामुळे ही पदे खुल्या प्रवर्गातून भरता येत नाहीत.

समितीने दिनांक ४ फेब्रुवारी २०१४ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षीच्यावेळी असे निदर्शनास आणून दिले की, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची बदली करताना मागासवर्गीय लोकांना न्याय दिला गेला पाहिजे. सन १९९७ नंतर भरलेल्या पदांसंबंधी विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या वर्गवारीतील पदे कशा पद्धतीने भरली आहेत याबाबत सविस्तर माहिती समितीला द्यावी. तसेच घटनेने मागासवर्गीयांना आरक्षण दिलेले आहे. विशेष करून गडचिरोली जिल्ह्यात सामाजिक असमतोल वेगवेगळ्या पद्धतीचा आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांना न्याय मिळावा व मागासवर्गीयांवर अन्याय होऊ नये असे समितीस वाटते.

अभिप्राय व शिफारशी :

समितीने दिनांक ४ फेब्रुवारी २०१४ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षीच्यावेळी असे निदर्शनास आणून दिले की, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची बदली करताना मागासवर्गीय लोकांना न्याय दिला गेला पाहिजे. सन १९९७ नंतर भरलेल्या पदांसंबंधी विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या वर्गवारीतील पदे कशा पद्धतीने भरली आहेत याबाबत सविस्तर माहिती समितीला द्यावी. **तसेच घटनेने मागासवर्गीयांना आरक्षण दिलेले आहे. विशेषकरून गडचिरोली जिल्ह्यात सामाजिक असमतोल वेगवेगळ्या पद्धतीचा आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांना न्याय मिळावा व मागासवर्गीयांवर अन्याय होऊ नये अशी समितीची अपेक्षा आहे, असे अभिप्राय समितीने व्यक्त केले.**

समितीने, दिनांक २३ सप्टेंबर, २०१३ रोजी गडचिरोली जिल्हा परिषद कार्यालयास दिलेल्या भेटीच्यावेळी समितीला आ वासित केल्यानुसार प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ४ फेब्रुवारी २०१४ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षीच्या वेळी विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील अनेक पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले.

(१) **गडचिरोली जिल्हा परिषदेत वर्ग-१ ते ४ मधील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या ५७८ पदांपैकी ५० पदे रिक्त असल्याचे समितीस अवगत करण्यात आले. जिल्हा परिषदेतील सदर ५० रिक्त पदे लवकरात लवकर भरून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(२) **समितीने शिक्षकांच्या भरतीबाबत विचारणा केली असता जिल्हा परिषदेतील शिक्षकांची ६५ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले. सदर ६५ पदे तात्काळ भरून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(३) **साक्षीच्या वेळी जिल्हा परिषदेतील काही ग्रामसेवकांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न करता त्यांनी फक्त प्रस्ताव पाठविल्याची पावती सादर केल्याचे समितीला आढळून आले. विभागाने फक्त सादर केलेल्या पोचपावत्यांवर अवलंबून न राहता ग्रामसेवकांकडून लवकरात लवकर वैधता प्रमाणपत्र मागवून घ्यावीत. तसेच अशा जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या ग्रामसेवकांवर व जात वैधता प्रमाणपत्र मागवून न घेणा-या जबाबदार अधिका-यांवर कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

परिशिष्ट - एक

जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडून समितीला प्राप्त झालेली माहिती

गडचिरोली जिल्हा परिषदेच्या सेवेतील सरळसेवा भरती पध्दतीने भरलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी, तांत्रिक व अतांत्रिक पदावरील कर्मचाऱ्यांची जुलै २०१३ अखेरपर्यंतची सद्य:स्थिती, बिंदु नामावलीनुसार शिल्लक असलेल्या अनुशेषाची माहिती व रिक्त पदे दर्शविणारे विवरणपत्र.

अतांत्रिक / तांत्रिक पदे

अ. क्र.	पदाचे नांव	वर्ष	वेतनश्रेणी	एकुण मंजुर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे	विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अ ब क ड यादीनुसार आरक्षित असलेल्या पदांची संख्या					विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अ ब क ड यादीनुसार प्रत्यक्षात भरण्यात आलेल्या पदांची संख्या					अनुशेष					अभिप्राय / शेरा
१	२	३	४	५	६	७	८					९					१०					१९
							अ	ब	क	ड	एकूण	अ	ब	क	ड	एकूण	अ	ब	क	ड	एकूण	
	अतांत्रिक																					
१.	वरिष्ठ सहाय्यक (लो.व.)	जुलै २०१३	५२००-२०२०० ग्रेडपे २४००	५५	५२	३	१	२	१	०	४	१	४	०	०	५	०	+२	१	०	+१	
२.	विस्तार अधिकारी (सांख्यिकी)		९३००-३४८०० ग्रेडपे ४२००	३०	३०	०	१	१	०	०	२	१	२	१	०	४	०	+१	+१	०	+२	
३.	कनिष्ठ सहाय्यक		५२००-२०२०० ग्रेडपे १९००	२०५	१९८	७	४	४	५	३	१६	३	५	१	६	१५	१	+१	४	+३	१	सन २०१३ ला जाहिरात दिली
४.	लघुलेखक (उ.श्रे.)		९३००-३४८०० ग्रेडपे ४४००	१	१	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	
५.	लघुलेखक (नि.श्रे.)		५३००-३४८०० ग्रेडपे ४३००	१	१	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	
६.	ग्राम सेवक		५२००-२०२०० ग्रेडपे २४००	४३७	४३४	३	८	१५	८	४	३५	८	१५	६	४	३३	०	०	२	०	२	सन २०१३ ला जाहिरात दिली
७.	कनिष्ठ लेखा अधिकारी		९३००-३४८०० ग्रेडपे ४२००	४	३	१	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	
८.	वरिष्ठ सहा.(लेखा)		५२००-२०२०० ग्रेडपे २४००	१८	१८	०	०	१	१	०	२	०	१	१	०	२	०	०	०	०	०	
९.	कनिष्ठ सहा. (लेखा)		५२००-२०२०० ग्रेडपे १९००	२५	२३	२	१	०	०	१	२	१	०	०	१	२	०	०	०	०	०	
१०.	प्राथमिक शिक्षक		५२००-२०२०० ग्रेडपे २८००	४४१३	४२४६	१६७	८८	८८	११०	६६	३५२	५४	८५	८२	६६	२८७	३४	३	२८	०	६५	सीईटी पूर्ण द्वारे भरण्यात येतात.
११.	कनिष्ठ व्याख्याता		९३००-३४८०० ग्रेडपे ४६००	२२	२१	१	१	१	०	०	२	१	१	०	०	२	०	०	०	०	०	
१२.	सहा.शिक्षक (उ.श्रे.)		९३००-३४८०० ग्रेडपे ४३००	५४	५४	०	१	१	१	१	४	०	१	२	१	४	१	०	+१	०	०	

अ. क्र.	पदाचे नांव	वर्ष	वेतनश्रेणी	एकुण मंजुर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे	विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अ ब क ड यादीनुसार आरक्षित असलेल्या पदांची संख्या					विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अ ब क ड यादीनुसार प्रत्यक्षात भरण्यात आलेल्या पदांची संख्या					अनुशेष					अभिप्राय / शेरा
१	२	३	४	५	६	७	८					९					१०					११
							अ	ब	क	ड	एकूण	अ	ब	क	ड	एकूण	अ	ब	क	ड	एकूण	
१३.	सहा.शिक्षक (नि.श्रे.)	जुलै २०१३	५२००-२०२०० ग्रेडपे २८००	३३	३३	०	१	१	१	०	३	१	१	१	०	३	०	०	०	०	०	
१४.	वि.अ. (शिक्षण)		९३००-३४८०० ग्रेडपे ४४००	१५	१४	१	१	०	०	०	१	०	०	०	१	१	१	०	०	+१	०	
१५.	प्रयोग शाळा सहा.		५२००-२०२०० ग्रेडपे २०००	७	६	१	१	०	०	०	१	०	१	०	०	१	१	+१	०	०	०	
१६.	पर्यवेक्षिका		९३००-३४८०० ग्रेडपे ४१००	३६	३६	०	१	१	१	०	३	०	३	०	०	३	१	+२	१	०	०	
१७.	परिचर		४४४०-७४४० ग्रेडपे १३००	६८३	६५०	३३	१४	१४	१७	१०	५५	६	२९	१०	५	५०	८	+१५	७	५	५	सन २०१३ ला जाहिरात दिली
१८.	स्विपर		४४४०-७४४० ग्रेडपे १३००	४५	४५	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	
१९.	चौकीदार		४४४०-७४४० ग्रेडपे १६००	७	५	२	१	०	०	०	१	०	०	०	०	०	१	०	०	०	१	अनुकंपा द्वारे भरण्यात येईल.
२०.	मदतनीस		४४४०-७४४० ग्रेडपे १३००	७	७	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	
	अतांत्रिक एकूण :-			६०१८	५८७७	२२१	१२४	१२२	१६५	८५	४८३	७६	१४८	१२४	८४	४१२	४८	+१९	४१	१	१७१	

अ. क्र.	पदाचे नांव	वर्ष	वेतनश्रेणी	एकुण मंजुर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे	विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अ ब क ड यादीनुसार आरक्षित असलेल्या पदांची संख्या					विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अ ब क ड यादीनुसार प्रत्यक्षात भरण्यात आलेल्या पदांची संख्या					अनुशेष					अभिप्राय / शेरा
१	२	३	४	५	६	७	८					९					१०					११
							अ	ब	क	ड	एकूण	अ	ब	क	ड	एकूण	अ	ब	क	ड	एकूण	
	तांत्रिक	जुलै २०१३																				
१.	वाहन चालक		५२००-२०२०० ग्रेडपे १९००	६२	६२	०	१	१	२	१	५	१	१	२	१	५	०	०	०	०	०	
२.	वि.अ.(पंचा.स.क.)		१३००-३४८०० ग्रेडपे ४२००	७	७	०	०	०	१	०	१	०	०	१	०	१	०	०	०	०	०	
३.	ग्रा.वि.अ.		५२००-२०२०० ग्रेडपे २८००	१३	१२	१	०	१	०	०	१	०	१	०	०	१	०	०	०	०	०	
४.	आरोग्य सेवक (पुरुष)		५२००-२०२०० ग्रेडपे २४००	२३९	२३९	०	५	५	६	४	२०	६	८	६	१	२१	+१	+३	०	३	+१	
५.	आरोग्य सेवक (महिला)		५२००-२०२०० ग्रेडपे २४००	४२१	४०१	२०	८	१	११	६	३४	२	४०	८	१	५१	३	+३१	३	५	+१७	
६.	औषधी निर्माता		५२००-२०२०० ग्रेडपे २८००	८४	८३	१	२	२	२	१	७	०	६	१	२	९	२	+४	१	+१	+२	
७.	प्रयोगशाळा तंत्रज्ञ		१३००-३४८०० ग्रेडपे ४२००	४५	४४	१	१	१	१	१	४	१	२	१	०	४	०	+१	०	१	०	
८.	वि.अ.(आरोग्य)		१३००-३४८०० ग्रेडपे ४२००	४	४	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	
९.	कनिष्ठ अभियंता		१३००-३४८०० ग्रेडपे ४३००	८८	८१	७	२	२	२	१	७	१	४	१	०	६	१	+२	१	१	१	
१०.	अनुरेखक		५२००-२०२०० ग्रेडपे २०००	१	१	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	
११.	स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक		५२००-२०२०० ग्रेडपे २४००	६२	३२	३०	१	१	२	१	५	२	२	०	०	४	+१	+१	२	१	१	सन २०१३ ला जाहिरात दिली
१२.	कनिष्ठ आरेखक		५२००-२०२०० ग्रेडपे २४००	३	३	०	०	१	०	०	१	०	१	०	०	१	०	०	०	०	०	
१३.	मिस्त्रि ग्रेड-१		५२००-२०२०० ग्रेडपे २०००	२	२	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	
१४.	जोडारी		५२००-२०२०० ग्रेडपे २४००	१	१	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	
१५.	तारतंत्री		५२००-२०२०० ग्रेडपे १९००	१	१	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	

अ. क्र.	पदाचे नांव	वर्ष	वेतनश्रेणी	एकुण मंजुर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे	विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अ ब क ड यादीनुसार आरक्षित असलेल्या पदांची संख्या					विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अ ब क ड यादीनुसार प्रत्यक्षात भरण्यात आलेल्या पदांची संख्या					अनुशेष					अभिप्राय / शेरा
१	२	३	४	५	६	७	८					९					१०					११
							अ	ब	क	ड	एकूण	अ	ब	क	ड	एकूण	अ	ब	क	ड	एकूण	
१६.	कनिष्ठ यांत्रिकी	जुलै २०१३	५२००-२०२०० ग्रेडपे २४००	१	१	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	
१७.	कृषी अधिकारी		१३००-३४८०० ग्रेडपे ४४००	५	५	०	१	०	०	०	१	१	०	०	०	१	०	०	०	०	०	
१८.	वि.अ.(कृषी)		१३००-३४८०० ग्रेडपे ४२००	१२	१२	०	१	०	०	०	१	१	०	०	०	१	०	०	०	०	०	
१९.	पशुधन पर्यवेक्षक		५२००-२०२०० ग्रेडपे २४००	८२	८०	२	२	२	२	१	७	०	९	१	०	१०	२	+७	१	१	+३	
२०.	कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)		१३००-३४८०० ग्रेडपे ४३००	२	२	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	
२१.	विजतंत्री		५२००-२०२०० ग्रेडपे १९००	१	१	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	
२२.	हातपंप यांत्रिकी		५२००-२०२०० ग्रेडपे १९००	१५	१२	३	०	१	०	०	१	०	१	०	०	१	०	०	०	०	०	
	तांत्रिक एकूण :-			११५१	१०८६	६५	२४	२६	२९	१६	९५	१५	७५	२१	५	११६	९	+४१	८	११	+२१	
	मागील अतांत्रिक एकूण:-			६०९८	५८७७	२२१	१२४	१२१	१४५	८५	४८३	७६	१४८	१०४	८४	४१२	४८	+१९	४१	१	७१	
	तांत्रिक+अतांत्रिक एकूण :-			७२४९	६९६३	२८६	१४८	१५५	१७४	१०१	५७८	९१	२२३	१२५	८९	५२८	५७	+६८	४९	१२	५०	

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर

१) जिल्हा परिषदेसाठी सन २०१०-११, २०११-१२, व सन २०१२ ते जुलै, २०१३ या आर्थिक वर्षात वर्षनिहाय मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी किती तरतुद करण्यात आली, त्यापैकी विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी शासनाने किती रक्कमेची तरतुद केली होती?

समाज कल्याण विभाग :-

जिल्हा परिषदेसाठी सन २०१०-११, २०११-१२, व सन २०१२ ते जुलै, २०१३ या आर्थिक वर्षात वर्षनिहाय मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी खालील प्रमाणे तरतूद केली असून विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी सदरहू प्राप्त तरतूद खालील प्रमाणे वर्ष निहाय खर्च करण्यात आलेला आहे.

प्रवर्ग	वर्ष	तरतूद	खर्च
विजाभज	सन २०१०-११	४९.१२	४९.१२
	सन २०११-१२	४२.६२	४२.६२
	सन २०१२-१३	३०.५९	३०.५९
	जूलै,२०१३	३६.००	कार्यवाही सुरु आहे.

२) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी सन २०१०-११, २०११-१२ व सन २०१२ ते जुलै, २०१३ या आर्थिक वर्षातील वर्षात शासनामार्फत कोणकोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात आल्या आहेत, सदर योजनांवर वर्षनिहाय किती रक्कम खर्च करण्यात आली?

समाज कल्याण विभाग :-

विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी सन २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षातील वर्षात शासना मार्फत खालील प्रमाणे विद्यार्थ्यांकरीता योजना राबविण्यांत आलेल्या असून सदर योजनांवर वर्षनिहाय खालील प्रमाणे खर्च करण्यांत आलेला आहे.

अ. क्र.	वर्ष	कल्याणकारी योजनेचे नांव	प्राप्त तरतूद	झालला खर्च	शिल्लक
१.	२०१०-११	अनुदानित वसतीगृहात प्रवेश देणे (विजाभज)	४.४६	४.४६	--
२.		शिष्यवृती देणे.	४९.१२	४९.१२	--
१.	२०११-१२	अनुदानित वसतीगृहात प्रवेश देणे (विजाभज)	२४.७०	२४.७०	--
२.		शिष्यवृती देणे.	४२.६२	४२.६२	--
१.	२०१२-१३	अनुदानित वसतीगृहात प्रवेशदेणे (विजाभज)	८.६०	८.६०	--
		शिष्यवृती देणे.	३०.५९	३०.५९	--
१.	२०१३-१४	अनुदानित वसतीगृहात प्रवेश देणे (विजाभज)	४५.४५	कार्यवाही सुरु आहे.	४५.४५
		शिष्यवृती देणे.	३६.००	कार्यवाही सुरु आहे.	३६.००

अ.क्र.	प्रश्न	उत्तर

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा :-

विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी इंदिरा आवास योजने अंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लाभार्थ्यांसाठी गत तीन वर्षात ९८५ घरे बांधण्यात आली. सदर योजनेवर ६,७४,७२,५००/- रुपये खर्च करण्यात आले. तालुकानिहाय बांधण्यात आलेली घरकुले व त्यावर करण्यात आलेल्या खर्चाची माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

अ.क्र.	तालुका	सन २०१०-११		सन २०११-१२		सन २०१२-१३		सन २०१३-१४		एकुण	
		संख्या	खर्च	संख्या	खर्च	संख्या	खर्च	संख्या	खर्च	संख्या	खर्च
१	अहेरी	०	०.००	४	२.७४	५९	४०.४१५	१	०.६८५	६४	४३.८४
२	आरमोरी	४७	३२.१९५	५३	३६.३०५	६३	४३.१५५	१५	१०.२७५	१७८	१२१.९३
३	भामरागड	०	०	०	०	०	०	०	०	०	०
४	चामोर्शी	७६	५२.०६	१४३	९७.९५५	२४	१६.४४	९	६.१६५	२५२	१७२.६२
५	धानोरा	२०	१३.७०	१२	८.२२	७	४.७९५	०	०	३९	२६.७१५
६	एटापल्ली	५	३.४२५	१	०.६८५	२	१.३७	०	०	८	५.४८
७	गडचिरोली	२७	१८.४९५	४८	३२.८८	९५	६५.०७५	५	३.४२५	१७५	११९.८७५
८	कोरची	४	२.७४	१८	१२.३३	९	६.१६५	१	०.६८५	३२	२१.९२
९	कुरखेडा	७	४.७९५	२४	१६.४४	१३	८.९०५	३	२.०५५	४७	३२.१९५
१०	मुलचेरा	०	०	४	२.७४	४	२.७४	०	०	८	५.४८
११	सिरोंचा	३७	२५.३४५	२८	१९.१८	७१	४८.६३५	१०	६.८५	१४६	१००.०१०
१२	देसाईगंज	१७	११.६४५	८	०५.४८	७	४.७९५	४	२.७४	३६	२४.६६
	एकुण	२४०	१६४.४०	३४३	२३४.९५५	३५४	२४२.४९	४८	३२.८८	९८५	६७४.७२५

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
३)	सन २०१०-११, २०११-१२ व सन २०१२ ते जुलै, २०१३ या गेल्या तीन वर्षात जिल्ह्यातील माध्यमिक शाळेत विमुक्त जाती व भटक्या जमातीचे एकुण किती विद्यार्थी शिक्षण घेत होते? त्यापैकी मुलांची व मुलींची संख्या किती होती?	**शिक्षण विभाग (माध्यमिक) :-** सन २०१०-११, २०११-१२ व २०१२- १३ या गेल्या तीन वर्षातील जिल्ह्यातील माध्यमिक शाळेत विमुक्त जाती व भटक्या जमातीचे एकूण ७०३२ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी मुलांची ३५१८ व मुलींची ३५१४ संख्या होती. विवरण खालील प्रमाणे.

वर्ष	मुले	मुली	एकूण
२०१०-२०११	१४३४	१४७१	२९०५
२०११-२०१२	११९७	१२६५	२४६२
२०१२-२०१३	८८७	७७८	१६६५
एकूण :-	३५१८	३५१४	७०३२

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
४)	सन २०१०-११, २०११-१२ व सन २०१२ ते जुलै, २०१३ या आर्थिक वर्षात तालुकानिहाय शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क यावर किती रक्कम खर्च करण्यात आली? तसेच, जिल्ह्यातील किती व कोणत्या शाळांमध्ये प्रवेश सत्र वाचणालय, प्रयोगशाळा व क्रिडा शुल्क शासनामार्फत परस्पर अदा करण्यात आली आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत?	**समाज कल्याण विभाग :-** सन २०१०-११, २०११-१२ व सन २०१२ ते जुलै, २०१३ या आर्थिक वर्षात तालुकानिहाय शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क यावर समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद गडचिरोली मार्फत अनुक्रमे ११.७६, ११.५०, ७.८० लाख रुपये खर्च करण्यात आलेला आहे. तालुका निहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.

तालूका	वर्ष व झालेला खर्च (शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क)			
	२०१०-११	२०११-१२	२०१२-१३	जूलै २०१३
गडचिरोली	२.९३	३.२८	१.७२	कार्यवाही सुरु आहे.
आरमोरी	१.२९	१.३९	०.९७	
देसाईगंज	२.४४	१.५०	१.५७	
कुरखेडा	०.३१	०.७२	०.४८	
कोरची	०.१३	०.७२	०.२७	
धानोरा	०.१४	०.३१	०.२३	
चामोर्शी	१.७५	१.४९	१.४२	
मुलचेरा	०.०३	०.१९	०.००	
अहेरी	०.८२	१.१२	०.६४	
भामरागड	०.०५	०.००	०.००	
एटापल्ली	०.१०	०.२६	०.०४	
सिरोंचा	१.७७	०.५२	०.४६	
एकूण	११.७६	११.५०	७.८०	

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
५)	सन २०१०-११, २०११-१२ व सन २०१२ ते जुलै, २०१३ या कालावधीत जिल्ह्यातील कोणकोणत्या शाळांमधील किती मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे. त्यापैकी ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी मध्ये किती विद्यार्थी शिक्षण घेत होते, त्यापैकी किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लागू केली आहे?	**समाज कल्याण विभाग :-** सन २०१०-११, २०११-१२ व सन २०१२ ते जुलै, २०१३ या कालावधीत समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद गडचिरोली मार्फत जिल्ह्यातील एकूण १२ पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या इयत्ता ५ वी ते १० मध्ये शिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे वर्ष निहाय शिष्यवृत्ती लागू केली आहे.

वर्ष	मागासवर्गीय विद्यार्थी संख्या	शिष्यवृत्ती (लक्ष)	त्यापैकी विजाभज ची विद्यार्थी संख्या	शिष्यवृत्ती (लक्ष)	झालेला खर्च
२०१०-११	१४८४६	११९.५०	५६००	३४.००	३४.००
२०११-१२	१५०७६	१४०.०७	५४३१	३१.१२	३१.१२
२०१२-१३	१२२४३	१०३.२५	३७७८	२२.६०	२२.६०
जुलै,२०१३	कार्यवाही सुरु आहे.				

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
६)	जिल्हा परिषद अंतर्गत माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती योजनेमध्ये मागील तीन वर्षात गैरव्यवहाराची/भ्रष्टाचाराची किती प्रकरणे आढळून आली आहेत? असल्यास, त्यामुळे किती अधिकारी/कर्मचारी दोषी आढळून आले आहेत? त्यानुसार त्याच्यावर कोणती कारवाई केली आहे?	**समाज कल्याण विभाग :-** जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती योजनेमध्ये मागील तीन वर्षात गैरव्यवहाराची /भ्रष्टाचाराची प्रकरणे आढळून आलेली नाहीत.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
७)	१) अनुदानित वसतीगृह चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनुदान प्रदान करण्याच्या अटी व शर्ती काय आहेत?	समाज कल्याण विभाग :- अनुदानीत वस्तीगृह चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनुदान प्रदान करण्याच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत. अटी व शर्ती :- १. स्वयंसेवी संस्था ही सोसायटी ॲक्ट १८६० व सार्वजनिक विश्वत अधिनियम १९५० अन्वये नोंदणी कृत केलेली संस्था असावी. २. संस्थेवर तसेच संस्थेच्या पदाधिका-यावर, कोणत्याही प्रकारचा पोलीस गुन्हा सिध्द होवून शिक्षा झालेली नसावी. ३. विद्यार्थी विभाभज या प्रवर्गातील असावा.
	२) सन २०१०-११, २०११-१२ व सन २०१२ ते जुलै, २०१३ या कालावधीत अनुदानित वसतीगृहातील लाभार्थ्यांना दरमहा पालनपोषण अनुदान, अधिक्षकांचे वेतन, वस्तीगृह, भाडे, इमारती परिक्षण अनुदान व भांडी, फर्निचर इत्यादीच्या खरेदीवर किती अनुदान देण्यात आले आहे, त्यापैकी किती रक्कम खर्च करण्यात आली?	समाज कल्याण विभाग :- सन २०१०-११, २०११-१२ व सन २०१२ ते जुलै, २०१३ या कालावधीत अनुदानित वसतीगृहातील लाभार्थ्यांना दरमहा पालनपोषण अनुदान, अधिक्षकांचे वेतन, वस्तीगृह, भाडे व इमारती परिक्षण अनुदान इत्यादीच्या खरेदीवर खालील प्रमाणे अनुदान देण्यात आले असून प्राप्त अनुदान व खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

अ. क्र.	वर्ष	विवरण	प्राप्त तरतूद	झालेला खर्च	शिल्लक रक्कम
१.	२०१०-११	अनुदानित वसतीगृहातील लाभार्थ्यांना दरमहा पालनपोषण अनुदान, अधिक्षकांचे वेतन, वस्तीगृह, भाडे, इमारती परिक्षणअनुदान	४.४६	४.४६	--
२.	२०११-१२		२४.७०	२४.७०	--
३.	२०१२-१३		८.६०	८.६०	--
४.	२०१३-१४		४५.४५	कार्यवाही सुरु आहे	४५.४५

टिप :- भांडी व फर्निचर इत्यादीची खरेदी ही समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांचे स्तरावरुन करण्यात येते.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली.

५	सन २०१२-१३,२०१३-१४,ते २०१४-१५ व सन एप्रिल २०१५ ते मे २०१५या कालावधीत जिल्हयातील कोणकोणत्या शांळामधिल किती मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लागु करण्यात आली आहे, त्यापैकी ५ वी ७ वी व ८ वी ते १० वी मध्ये किती विद्यार्थी शिक्षण घेत होते, त्यापैकी किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लागु केली आहे ?	भंडारा जिल्हामध्ये एकुण ५ वी ते १० च्या ५४४ शाळा असुन सर्व शाळातील विमुक्त जाती भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे योजनाचा लाभ देण्यात आला.

अ.क्रं.	योजनेचे नाव	लाभार्थी संख्यां (योजनेत्तर व योजनातर्गत)			
		२०१२-१३	२०१३-१४	२०१४-१५	एप्रील १५ ते मे १५
१	शिक्षण फी परिक्षा फी देणे	२९९३	३०४८	२८१९	निरंक
२	इ.५वी ते ७ वी मधिल मुलीना शिष्य.	४६८५	४१४६	३८७३	निरंक
३	माध्य.शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्य.	११३६	९४५	११७१	निरंक

६	जिल्हा परिषद अंतर्गत माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्या साठी राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती योजनेमध्ये मागील तीन वर्षात गैरव्यवहारारची /भ्रष्टाचा राची किती प्रकरणे आढळुन आले आहेत ?त्यानुसार त्यांच्यावर कोणती कारवाई केली आहे ?	या विभागामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनामध्ये मागील तिन वर्षात गैरव्यवहार/भ्रष्टाचाराची कोणतेही प्रकरण आढळुन आले नाही.
७	(१) अनुदानीत वसतीगृह चालविणा-या स्वयंसेवी संस्थांना अनुदान प्रदान करण्याच्या अटी व शर्ती काय आहे ?	सामाजिक न्याय विभागामार्फत मान्यता प्राप्त अनुदानित वसतिगृहांना खालीलप्रमाणे अनुदान देण्यात येते व त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत **१) परिपोषण अनुदान :-** विद्यार्थ्यांच्या परिपोषणावर होणारा खर्च रु.६३०/- प्रति विद्यार्थी दर महा व दिनांक १ जानेवारी २०१२ पासून रु.९००/- दरमहा प्रति विद्यार्थ्यांकरिता १० महिण्याकरिता संस्थेस अदा करण्यात येते. परिपोषण अनुदान विद्यार्थ्यांच्या सरासरी उपस्थितीच्या ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास १०० टक्के अनुदान व सरासरी ७५ टक्के पेक्षा कमी असल्यास उपस्थितीप्रमाणे परिपोषण अनुदान देय आहे. **२) कर्मचारी मानधन :-** वसतिगृहात कार्यरत अधिक्षक यांना रु.४५००/- दरमहा, स्वयंपाकी रु.३७५०/- मदतनीस रु.३०००/- दरमहा व चौकीदार यांना रु३०००/- दरमहा मानधन बॅकेद्वारे अदा करण्यात येते. दिनांक १५.६.२०१३ पासून मानधनात वाढ झालेली असून अधिक्षक यांना रु.८०००/-दरमहा , स्वयंपाकी रु.६०००/- दरमहा, मदतनीस रु.५०००/-दरमहा व चौकीदार रु.५०००/- दरमहा अदा करण्यात येते.

उप मुख्यकार्यकारी अधिकारी
(सामान्य)

परिशिष्ट - दोन

समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

पहिली बैठक

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजी जिल्हा परिषद, गडचिरोली येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :–

उपस्थिती :

१. डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
२. श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स.
३. श्री. पृथ्वीराज साठे, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

१. श्री. जितेंद्र भोळे, उप सचिव,
२. श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

जिल्हा परिषद, गडचिरोली :

१) श्री. रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी,
२) श्री. एस. बी. बैजलवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
३) श्री. फ. र. कुत्तीरकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
४) श्री. जी. एल. मेश्राम, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),
५) श्री. प्रभु राजगडकर, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
६) श्री. दा. म. राऊत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
७) श्री. व्ही. एम. वाकुलवार, संशोधन अधिकारी, सदस्य सचिव, आ.प्र.प.चंद्रपूर,
८) श्री. यु. के. नरड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
९) श्री. व्ही. एस. कोळेकर, कृषी विकास अधिकारी,
१०) श्री. पी. ई. कवाडे, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
११) डॉ. एस. जी. गोगुलवार, जिल्हा आरोग्य अधिकारी,
१२) श्री. रवी वि. पराते, कार्यकारी अभियंता.

सहायक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, नागपूर :

श्री. के. एन. के. राव, सहायक आयुक्त

सदर बैठकीत समितीने जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिका-यांशी चर्चा केली.

दुसरी बैठक

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ४ फेब्रुवारी २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :–

उपस्थिती :

१) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
२) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.
३) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स.
४) श्री. विजय सावंत, वि.प.स.
५) श्री. भगवानराव साळुंखे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. जितेंद्र भोळे, उप सचिव,
(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

विभागीय प्रतिनिधी :

१) श्री. एस. एस. संधु, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग,

२) श्री. दि. रा. डिंगळे, उप सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (मा.व.क.),

३) श्री. ग. के. रहाटे, उप सचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग.

जिल्हा परिषद, गडचिरोली :

१) श्री. रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली,
२) श्री. विजय शंकर मुळीक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा.प्र.वि.),
३) श्री. उल्हास नरड, शिक्षण अधिकारी, गडचिरोली.

सदर बैठकीत समितीने प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, व उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष) यांची साक्ष घेतली.

तिसरी बैठक

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २३ नोव्हेंबर २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :–

उपस्थिती :

१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
३) श्री. महादेव जानकर, वि.प.स.
४) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

१. डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
२. श्री. राजेश तारवी, उप सचिव,
३. श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
४. श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारुप अहवालावर विचार करून काही दुरुस्त्यांसह तो संमत केला.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.